**कृपया प्रसिध्दीसाठी** **8 एप्रिल 2013**

## उपराष्ट्रपतींच्या हस्ते 6 राज्यांतील 10 कुष्ठसेवक महिलांचा सत्कार समारंभ

**मुंबई, सोमवारः** कुष्ठपीडितांच्या स्वयंभू कुष्ठवसाहतीत राहणा-या सहा राज्यांतील दहा कुष्ठसेवक महिला कार्यकर्त्यांचा सत्कार उपराष्ट्रपती श्री. मो. हामिद अंसारी यांच्या हस्ते पुणे येथे आंतरराष्ट्रीय कुष्ठनिवारण संस्था-आरोग्य संधानच्या वतीने करण्यात येणार आहे.  या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन् तर राज्य सरकारच्यावतीने आदिवासी विकास राज्यमंत्री श्री. राजेंद्र गावित, पुण्याच्या महापौर श्रीमती वैशाली बनकर आणि संस्थेचे संरक्षक न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी उपस्थित राहणार आहेत.  कार्यक्रम बुधवार, 10 एप्रिल रोजी दुपारी 4.00 वाजता पुणे येथील राजभवन परिसरातील ‘यशदा’ सभागृहात होणार आहे.  ही माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबई येथे दिली.

कार्यक्रमासंबंधी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले,‘‘कुष्ठपीडित समाज हा सामाजिक उतरंडीतील गरीबांपेक्षाही खालच्या पायरीवरील, सर्वात उपेक्षित आणि तिरस्कृत समाज आहे.  त्यातही गावकुसाच्या बाहेर स्वयंभू वसाहतीत राहणा-या कुष्ठपीडितांची अवस्था दयनीय असते तर तेथील महिलांची अवस्था अधिकच दयनीय असते.  अशा समाजातील वसाहतींमध्ये राहून कुष्ठपीडितांच्या सक्षमीकरणासाठी काम करणा-या सहा राज्यांतील दहा महिला कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.  त्यांची नावे आहेतः (1)श्रीमती माया रणावरे, कोल्हापूर (महाराष्ट्र), (2)श्रीमती वत्सला संगीत, दापोडी (महाराष्ट्र), (3)श्रीमती सीता देवी, पाटणा (बिहार), (4)श्रीमती भिमबाई मराठे, विजापूर (कर्नाटक), (5)श्रीमती बासम्मा देवनूर, गुलबर्गा (कर्नाटक),  (6)श्रीमती नेविस मारी, मदुराई (तामिळनाडू), (7)श्रीमती सरिता मारथा, कटक (ओडिशा), (8)श्रीमती हीरा भंडारी, इंदौर (मध्य प्रदेश), (9)श्रीमती पार्वतीबाई प्रेमा सिंह, रतलाम (मध्य प्रदेश), (10)श्रीमती कमलाबाई चाँदरास, अल्वासा (मध्य प्रदेश).’’

..2..

‘‘या कुष्ठसेवक महिला कार्यकर्त्यांनी विविध प्रकारे जी कुष्ठपीडित समाजाची सेवा केली त्यामध्ये समाविष्ट उल्लेखनीय कामे अशी आहेतः महिलांचे स्वयं सहाय्यता गट स्थापन करुन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे, बकरी आणि म्हैस पालन, शेती, कुष्ठ वसाहतीसाठी पिठाच्या आणि मसाल्याच्या गिरण्या सुरु करणे, शिलाईचे शिक्षण व व्यवसाय, लहान मुलांचे शिक्षण, वैद्यकीय मदत करणे, सरकारी योजनांतून घरे बांधून देणे, पाणी - गटारे-पायवाटा-वीज, शिधावाटप पत्रिका, आदी नागरी सुविधा प्राप्त करुन घेणे, अंधश्रद्धा निर्मूलन तसेच मानवी हक्कांबद्दलची जागृती’’, अशी माहितीही श्री. राम नाईक यांनी सांगितली. कुष्ठपीडित वस्तीतच राहून काम करणा-या या महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या महिलांचे कार्य सर्व सामान्य जनतेपुढे पोहचावे आणि त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा या दृष्टीने आमच्या संस्थेने पुढाकार घेतला आहे. उचित असा सत्कार केल्याने त्यांचा व त्यांच्या सहकारी महिलांचाही उत्साह द्विगुणीत व्हावा आणि कुष्ठरोग निर्मुलनाचे राष्ट्रीय कार्य जोमाने पुढे जावे, अशी भावना यामागे आहे.

‘‘देशातील कुष्ठपीडितांच्यावतीने आम्ही जो विनंती-अर्ज 5 डिसेंबर 2007 रोजी राज्यसभेला सादर केला होता त्या अर्जाची चौकशी करुन संसदेच्या विनंती अर्ज समितीने त्यांच्या शिफारसींचा अहवाल 24 ऑक्टोबर 2008 रोजी संसदेत सादर केला. त्यानंतर कृती अहवाल (ॲक्शन टेकन रिपोर्ट) 22 नोव्हेंबर 2010 रोजी सादर करण्यात आला. त्या शिफरसींची अंमलबजावणी व्हावी म्हणून 14 सप्टेंबर 2011 आणि 15 जून 2012 रोजी त्यावेळच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांच्याशी चर्चा करण्यात आली. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशीही वेळोवेळी चर्चा करण्यात आली. विनंती-अर्ज करुन पाच वर्षे होऊन गेली तरीही त्यातून अद्याप समाधानकारक निर्णय झाले नाहीत’’, अशी खंतही श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली.

**(कार्यालय सचिव)**